नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६३ Issue - 63 | वार रविवार दि. २० जुलै २०२५ Blow- Sunday Date 20 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पंढरीत तीन महिला भाविकांचा चंद्रभागेत बुडून दुर्दैवी मृत्यू

### जालन्याच्या भोकरदन तालुक्यातील धावडा गावावर शोककळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूरमध्ये अतिशय दुर्दैवी घटना समोर आली आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेल्या तीन महिला भाविकांचा हृदयद्रावक मृत्यू झाला आहे. चंद्रभागेत स्नान करताना तीनही महिला बुडाल्याने एकच खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये जालना जिल्ह्यातील दोन आणि एका अनोळखी महिलेचा समावेश आहे. आज, शनिवारी सकाळी सात वाजता ही दुःखद घटना घडली आहे.

जालन्याच्या भोकरदन तालुक्यातील धावडा गावच्या दोन महिला आणि एक अनोळखी महिला पुंडलिक मंदिराजवळ चंद्रभागेत स्नान करण्यासाठी उतरल्या होत्या. नदीत आंघोळीसाठी उतरल्या खऱ्या पण पाण्याचा अंदाज न आल्याने त्या बुडाल्या. काही भाविकांच्या हे लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. महिलांना वाचवण्याचा प्रयत्नही करण्यात आला. पण पाण्याचा प्रवाह खूप जास्त असल्याने तीनही महिलांना वाचवता आलं नाही. सुनीता सपकाळ (वय ४३) आणि संगीता सपकाळे (वय ४०) या धावडा गावच्या रहिवासी आहेत. तिसऱ्या महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही.



या घटनेमुळे प्रशासनाच्या आपत्कालीन व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. पंढरपूर प्रशासनाने चंद्रभागा नदीत आपत्कालीन घटनेसाठी एक बोट आणि काही कर्मचारी दिल्याचा गवगवा केला. पण वास्तविकपणे नदीत कोणतीही आपत्कालीन व्यवस्था अस्तित्वात नाही. असं चर्चा सर्वसामान्यांमध्ये होते आहे. प्रशासनाने सुविधा दिल्याचं सांगितलं, पण प्रत्यक्षात कोणतीही मदत उपलब्ध नव्हती, असं बोललं जात आहे.

आज सकाळी या महिला बुडाल्यानंतर नदीतील कोळी बांधवांनी त्यांचे मृतदेह बाहेर काढले. प्रशासनाने तातडीने मदत न पुरवल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. नदीत आपत्कालीन व्यवस्था असती, तर कदाचित या महिलांचा जीव वाचवता आला असता, अशी प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

या दुर्घटनेमुळे पंढरपूरमध्ये शोककळा पसरली आहे. भाविकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. तर महिलांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## रत्नागिरी येथील समुद्रात बुडून चार पर्यटकांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



रत्नागिरी : रत्नागिरीतील आरेवारे समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या चार पर्यटकांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. आरे वारे समुद्रात बुडालेले चारही पर्यटक रत्नागिरी शहरातील ओसवाल नगर येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. बुडालेल्या चार पर्यटकांपैकी तीन पर्यटक महिला तर एक पुरुष आहे.

रत्नागिरी तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसाची उघडीप असल्याने समुद्रकिनारी पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शनिवार आणि रविवार या दिवशी आरे वारे समुद्र किनारी पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे.

शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ओसवाल नगर येथून आरे वारे समुद्र येथे पर्यटनासाठी आलेले चार पर्यटक बुडाल्याची घटना घडली. या चार जणांमध्ये जुनेद बशीर काझी (३० ओसवाल नगर), जैनब जुनेद काझी (२८ ओसवाल नगर) उजमा समशुद्दीन शेख (१७ मुंबई मुंब्रा) उमेरा शमशुद्दीन शेख (१६ मुंब्रा) बुडालेल्या चार पर्यटकांपैकी दोन पर्यटक हे नुकतेच मुंबई येथून आले होते. समुद्रात उरलेल्या नंतर पाण्याचा अंदाज न आल्याने चारही जण पाण्यात बुडाले. अवघ्या काही मिनिटांत चारही जण खोल समुद्रात बुडाल्याने चारही जणांचा बुडून मृत्यू झाला.

या घटनेची माहिती स्थानिक पोलिस पाटील आदेश कदम यांनी ग्रामीण पोलिस निरीक्षक यांना माहिती दिली. मोठ्या दुर्घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक श्री बघते यांनी घटनास्थळाला भेट दिली. चारही पर्यटकांना स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले.

दरम्यान, पुढील ३ तासांत रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागरिकांनी सतर्क राहावे.

समुद्र किनारे, गड किल्ले या ठिकाणी गेल्यानंतर पर्यटकांनी सतर्कता बाळगण्याची गरज आहे. पर्यटनस्थळी गेल्यानंतर सतर्कता न बाळगल्यानं दुर्घटना घडतात. त्यामध्ये अनेकांचे जीव जातात. जीवितहानी टाळण्यासाठी पर्यटकांनी पर्यटनस्थळी गेल्यानंतर सतर्कता बाळगणं गरजेचं आहे.

## राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला मिळणार नवीन इमारती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या नियोजनबद्ध आणि गतिशील काम करण्याच्या पध्दतीमुळे राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाची सुत्रे हातात घेतल्यापासून श्रीमती पंकजा मुंडे यांनी एका मागोमाग एक चांगल्या निर्णयासह आपल्या कामाचा धडाका सुरू केला आहे. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसूली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह साठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.



बीड जिल्ह्यात सर्व सहा मतदारसंघात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत, त्यांची विभागनिहाय संख्या पुढील प्रमाणे- मुंबई विभाग - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग - पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग - नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग - छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्ह्यात ५१, लातूर विभाग- लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यात ३९, अमरावती विभाग- अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यात ३८, नागपूर विभाग- नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३२७ ठिकाणी नवीन इमारतीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

## विजेचा धक्का लागून युवकाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची येथे गुरुवारी एक दुर्दैवी घटना घडली. आदित्य सिताराम मोहिते (वय १६) नावाच्या एका तरुणाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. तो घरातील पाण्याच्या हौदात पडलेला जार काढायला गेला होता. आदित्य हा त्याच्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अकाली जाण्याने संपूर्ण गावात शोक पसरला आहे. आदित्य मोहिते हा १६ वर्षांचा होता. गुरुवारी सकाळी तो नेहमीप्रमाणे व्यायाम करून घरी परतला. त्याला घरातील पाण्याच्या हौदात एक जार पडलेला दिसला. तो जार काढण्यासाठी हौदावर चढला. त्यावेळी त्याचा हात पत्र्याच्या अँगलला लागला. त्यावेळी त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. घरातील लोकांनी हे पाहताच, त्यांनी लगेच घरातील वीज बंद केली. पण तोपर्यंत आदित्य विजेचा जोरदार धक्का लागून हौदात कोसळला होता. एका क्षणात हसत्या - खेळत्या कुटुंबाचा नियतीने घात केला.



कुटुंबीयांनी त्याला तातडीने सोलापूरच्या यशोधरा रुग्णालयात दाखल केलं. पण डॉक्टरांनी त्याला तपासून उपचारांपूर्वीच मृत घोषित केलं. त्यानंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. व्यायाम करून परतलेला आदित्य काही वेळातच जगाचा निरोप घेईल, असे कुणालाही वाटलं नव्हतं.

आदित्य मोहिते हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. तो नुकताच दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून पास झाला होता. शहरातील एका कॉलेजमध्ये त्याने अकरावीसाठी ॲडमिशनही घेतलं होतं. एकुलत्या एक मुलांचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या जाण्याने कुटुंबावर मोठं संकट आलं आहे. गावामध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. आदित्यच्या मित्र परिवारालाही मोठा धक्का बसला आहे. त्याच्या आठवणींनी सगळीकडे शोक व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी या घटनेची नोंद करून तपास सुरू केला आहे.

गुन्हेगारीवर लगाम

सुरक्षिततेपासून विकासापर्यंत महाराष्ट्राचे आश्वासक पाऊल

## राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्रातील विविध महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती देण्यात येत असून मेट्रो, विमानतळ, रेल्वे, टनेल, सी-लिंक आणि कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना वेगाने चालना देण्यात येत आहे. राज्याच्या विकासासाठी आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करून शहरी आणि ग्रामीण विकास अधिक गतिमान केला जात आहे. तसेच, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यात आली आहे. यामुळे सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीसारखे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे.

सुरक्षिततेपासून विकासापर्यंत महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल सुरू आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभेत म.वि.स.नियम २९२अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना बोलत होते.

**राज्यातील गुन्हेगारीत लक्षणीय घट, सायबर कॉर्पोरेशन स्थापन**

राज्यात २०२३ च्या तुलनेत यावर्षी तब्बल ११ हजार ६५९ गुन्ह्यांत घट झाली असून, गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये उघडकीस येण्याचे प्रमाण १६ टक्क्यांवरून १९ टक्क्यांवर पोचले आहे. आर्थिक फसवणुकीतील परत मिळणाऱ्या रकमेचे प्रमाण २०.७५ टक्क्यांवरून ६१ टक्क्यांवर आले आहे. 'गोल्डन अवर'मध्ये माहिती मिळाल्यास ९० टक्के प्रकरणांत पैसे वाचवता येतात. सायबर सुरक्षेसाठी 'सायबर कॉर्पोरेशन' स्थापन करण्यात आले असून जिल्ह्यांत ५० सायबर प्रयोगशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच सायबर तक्रारींसाठी १९४५ व १९३० हे विशेष क्रमांक कार्यान्वित करण्यात आले आहेत. महिला अत्याचाराच्या घटनेतील ९१ टक्के प्रकरणे उघडकीस आणण्यात यश आले आहे, बलात्काराच्या घटनेत ९८ टक्के आरोपींची ओळख पटली आहे. तसेच बलात्कार प्रकरणांत ६० दिवसांत निर्णय होण्याचे प्रमाणही ९७.३ टक्क्यांपर्यत वाढले आहे.

**उपनगरीय रेल्वेचे सर्व डबे एसी होणार; तिकीट दर वाढणार नाही**

उपनगरीय रेल्वेला दरवाजे नसल्याने दुर्दैवी दुर्घटना घडत आहेत. यावर उपाययोजना म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे मेट्रोसारखे डबे उपनगरीय रेल्वेला द्यावे, अशी मागणी केली आहे. या संदर्भात सकारात्मक निर्णय झाला असून याची लवकरच घोषणा केली जाईल. त्यामुळे प्रवाशांना मुंबईतील उपनगरीय रेल्वेचे सर्व डबे मेट्रोसारखे एसी आणि दरवाजे बंद असणारे उपलब्ध होणार आहेत. यामध्ये तिकीटदर न वाढवता प्रवाशांना ही सेवा उपलब्ध होणार आहे. तसेच मेट्रो, रेल्वे, मोनोरेल आणि बेस्ट बसमधून एकाच तिकिटावर प्रवास करणे लवकरच मुंबईकरांना शक्य होणार आहे. यासाठी एकात्मिक तिकीट प्रणाली विकसित करण्यात येत आहे



**अंमली पदार्थविरोधात कठोर कारवाई**

अंमली पदार्थाच्या विरोधात राज्यशासनाने कारवाईची कडक भूमिका घेतली आहे. २०१८ अखेरीस १५६८ आरोपींना अटक करण्यात आली होती, तर २०२५ अखेरीस ही संख्या वाढून २१९८ झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पोलिस ठाण्यात आता नार्कोटिक्ससाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात आले आहेत. अंमली पदार्थ प्रकरणांमध्ये जे अधिकारी थेट किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेले आढळतील, त्यांचे केवळ निलंबन न करता आता थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांसाठी 'हरित वीज क्रांती

शेतकऱ्यांना 'हरित वीज' (ग्रीन एनर्जी) पुरवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या निर्णयामुळे राज्याला वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. राज्याच्या शाश्वत विकासासाठी 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात आली असून, सध्या ५० टक्के वीज हरित स्रोतांतून निर्माण होते. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील.पीएम कुसुम योजनेअंतर्गत राज्यात ६० टक्के कृषी पंप बसविले आहेत तीन महिन्यात ३ लाख ८६ हजार कृषी पंप बसवण्यात आले आहेत.यामुळे २३ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेंतर्गत घराच्या छतावर 'सोलर रूफ टॉप' यंत्रणा बसवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ ३० लाख कुटुंबांना होणार असून वीजबिल भरावे लागणार नाही.

**व्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण करणारा जनसुरक्षा कायदा**

जनसुरक्षा कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीला थेट अटक करता येत नाही. व्यक्तीविरोधात अटकेची कारवाई करण्यासाठी ठोस आणि न्यायिकरित्या ग्राह्य धरता येणारे पुरावे आवश्यक असतात. तसेच, एखाद्या संघटनेवर बंदी घालायची असल्यासही ती कार्यवाही न्यायालयीन देखरेखीखाली होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि लोकशाही तत्वांचे काटेकोर पालन करूनच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा तयार करण्यात आला आहे.

**लोकप्रतिनिधींनी संसदीय परंपरा, संसदीय भाषा आणि संवाद ही त्रिसूत्री जपली पाहिजे**

विधानभवन लोकप्रतिनिधींच्या, मंत्र्यांच्या, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मालकीची नाही, ही विधानसभा महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या मालकीची आहे. अधिवेशनात काळात जी घटना घडली ती सर्वांच्या मनाला वेदना देणारी आहे. विधानसभेतून समाजाला दिशा देण्याचे काम झाले पाहिजे. लोकप्रतिनिधींनी याविषयी चिंतन करण्याची गरज आहे. निवडून आल्यानंतर आपण सर्वांनी संसदीय परंपरांचे, संसदीय भाषेचे पालन व सातत्यपूर्ण संवाद या त्रिसूत्रीचे पालन केले पाहिजे.

**धारावी पुर्नविकासात स्थानिकांना आहे त्या ठिकाणी घरे देणार**

धारावी पुर्नविकास प्रकल्पात झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन धारावीमध्येच केले जाणार आहे आणि उद्योजकांना त्याच ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. कोणतीही जमीन अदानींना देण्यात आलेली नाही, ही जमीन 'डीआरपी'ला देण्यात आली आहे. यामध्ये छोट्या उद्योजकांना उत्तम व्यवस्था निर्माण करुन संघटित क्षेत्रात आणणार आहे. तसेच टॅक्ससाठी पुढील पाच वर्ष टॅक्स हॉलिडे देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. २० जुलै २०२५ 

# आयटीआय प्रवेश प्रक्रियेमध्ये दुहेरी लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई

## रोजगार, स्टार्टअप्स आणि कौशल्य विकासासाठी सरकारची नवी दिशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेत २६० च्या प्रस्तावावर उत्तर देताना कॅबिनेट मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (खढख) प्रवेश घेताना अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक दोन्ही सवलतींचा गैरफायदा घेतलेल्या विद्यार्थ्यांवर शासनाद्वारे कारवाई करण्यात येणार आहे. खोट्या मार्गाने मिळवलेले फायदे थांबवून प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या अधिवेशनात मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी देखील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत स्पष्ट केले होते की, अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख समाजातील नागरिकांनाच मर्यादित आहे. इतर धर्मांतील काहींनी जर अशी जात प्रमाणपत्रे वापरून हा लाभ घेतला असेल, तर त्यांच्या प्रमाणपत्रांची वैधता रद्द करण्यात येईल, त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई

### विधान परिषदेत कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांचा ठाम पवित्रा

केली जाईल आणि सरकार या संदर्भात आणखी प्रभावी उपाययोजना करण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर खढख मध्ये बनावट प्रमाणपत्रांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांविरोधात होणारी कारवाईही महत्त्वाची ठरणार आहे.

रोजगार, स्टार्टअप्स आणि कौशल्य विकासासाठी सरकारची नवी दिशा

आज विधानपरिषदेमध्ये बोलताना श्री. लोढा यांनी राज्य सरकारच्या रोजगार, स्टार्टअप आणि कौशल्य विकास योजनांचा आढावा सादर केला. ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आयटीआय अद्ययावत करण्यासाठी झझझ मॉडेल अमलात आणण्याचा क्रांतिकारी निर्णय आमच्या विभागाने घेतला. याद्वारे आयटीआयमध्ये पायाभूत सुधारणा, नवीन सुविधा, तंत्रज्ञान आणि विकासासाठी आवश्यक पाठबळ पुरवले जाईल. इतकेच नाही तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, नवीन अभ्यासक्रम, रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी सहकार्य उपलब्ध होईल. आयटीआयमधील कोर्सेसला डिप्लोमा दर्जाची मान्यता मिळावी यासाठी देखील आम्ही प्रयत्नशील आहोत, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले कि विविध माध्यमांतून पाच लाख विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी पाठबळ पुरवण्याचा सरकारचा मानस आहे. स्टार्टअप सुरू करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचा आवश्यक अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी विशेष प्रशिक्षणाची योजना राबवण्यात येणार आहे. तसेच, स्टार्टअप्स आणि व्यवसायांसाठी मुंबईजवळ जगातील सर्वोत्तम 'इनोव्हेशन सिटी' उभारण्याचे काम सरकारने हाती घेतले आहे. प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत इनक्युबेशन सेंटर सुरू करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि तांत्रिक मदत दिली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. या सर्वांसाठी शिक्षकांचे प्रशिक्षण सुद्धा अतिशय महत्वाचे असून, त्या अनुषंगाने औंध येथे ट्रेन द टीचर्स उपक्रमासाठी विशेष भवनाचे निर्माण केले जात आहे.



महाराष्ट्रातील उद्योजकांना उद्देशून श्री. लोढा यांनी आवाहन केले की, त्यांच्या उडठ निधीचा उपयोग स्थानिकांसाठी, करावा, जेणेकरून त्या परिसरातील तरुणांना रोजगार आणि संधी मिळू शकतील. महाराष्ट्रात पुढील पाच वर्षांत असा एकही विद्यार्थी उरणार नाही ज्याला रोजगार मिळाला नाही किंवा स्वयंरोजगारासाठी प्रयत्न करण्याची संधी मिळाली नाही, असा ठाम विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी नावाप्रमाणे विविध कार्य करावी : प्रशांत परिचारक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर तालुका गटसचिव संघटना व डीसीसी बँक कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर तालुक्यातील शंभर टक्के कर्ज वसुली करणाऱ्या विविध कार्यकारी सोसायटी च्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या शुभहस्ते आयोजित केला होता .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन दिनकर भाऊ मोरे होते.

केंद्र शासनाच्या सहकार विभागाच्या धोरणानुसार प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना सक्षम करण्यासाठी १५१ उद्योग करण्याची परवानगी संस्थांना दिली आहे त्यानुसार संस्थांनी कर्जवाटप व वसुली एवढा एक कलमी कार्यक्रम न राबवता संस्थांनी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून समाज उपयोगी विविध उद्योग करावेत. संगणकीकरणामुळे संस्थांच्या लेखापदतीमध्ये पारदर्शकता आली असून सहकारी संस्थांमध्ये विश्वस्त म्हणून काम केल्यास सहकाराचे भविष्य उज्वल आहे. असे प्रतिपादन आमदार परिचारक यांनी केले याप्रसंगी सोलापूर जिल्हा बँकेचे व्यवस्थापक पदी मिलिंद देशपांडे, विभाग प्रमुख पदी दादासाहेब सावंत सीनियर बँक इन्स्पेक्टर पदी तानाजीराव मोरे, भारत झांबरे यांची पदोन्नतीने नियुक्ती झाल्याबद्दल मा. आमदार प्रशांत परिचारक यांचे शुभहस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सेवानिवृत्ती निमित्त सुधीर भाळवणकर, मधुकर पवार ,भीमराव माने, तात्या लोखंडे, बाळासाहेब शिंदे, शिवाजी शिरसागर ,मोहन कसबे ,शंकर कावडे ,अशोक लंगोटे ,यांचा सन्मान करण्यात आला .सदर कार्यक्रमास कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास खुळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश दादा गायकवाड, उपसभापती राजू बापू गावडे, प्रणव परिचारक यांच्यासह पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक, मार्केट कमिटीचे संचालक उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ पाटोळे व विजय मोकळे यांनी केले,प्रास्ताविक बंडू गुरव यांनी केले. उपस्थित मान्यवरांचेआभार मधुकर कदम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंढरपूर तालुका गट सचिव संघटने च्या पदाधिकाऱ्यानी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केला इशारा जाता जाता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यक्ष मुख्यमंत्री व भाजपचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विधान परिषदेचे आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांच्या मित्र परिवारांनी मंगळवार दिनांक २२/०७/२०२५ रोजी सकाळी१०/३० यावेळीत शिवाजी चौक अकलूज येथे भव्य रक्तदान शिबिराची आयोजन केल्याचे सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर निष्ठावान भाजपच्या कार्यकर्त्यांमधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची हरणजीत सिंह मोहिते पाटील यांना वाढदिवसाच्या आठवण येण्याचे खरे कारण पुढच्या वाढदिवसापर्यंत रणजीत सिंह मोहिते पाटील यांचे आमदार नाही व आमदारकीची मुदत काही महिना वर येऊन ठेपलेली आहे त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमदार रणजीत हे मोहिते पाटील यांचा निष्ठावण कार्यकर्ता असल्याचा इशारा जाता जाता केला असलेली राजकीय वर्तुळात खळबळ माजलेली असून ब्लड सुलट चर्चेला उधाण आलेले आहे भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार सरणजीत सिंह मोहिते पाटील मित्र परिवार कार्यकर्त्यांनी हा उतना मावशीचे प्रेम उत्पन्न का झाले अशी कुमार चर्चा सुरू झाली आहे.

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारीची निवडणुकीत काम न करता विरोधी गटाच्या उमेदवारीची काम केले असली की ठपका भाजपचे नेते व कार्यकर्त्यांनी ठेवलेल्या होता व अनेक वेळा समाज माध्यमातून



आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांची भारतीय जनता पक्षातून अकरपट्टी करावी अशी जोरदार मागणी होत होती मात्र रणजीत सिंह मोहिते पाटील विधान परिषदेचे आमदार असल्याने तांत्रिक अडचणी असेल त्यांच्याकडून केंद्राकडे सबळ पुरावेस प्रस्ताव पाठवण्याची केंद्रीय नेतृत्व निर्णय घेणार आहे.

विधानसभेच्या वेळी रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांची जाहीर सभा अकलूज येथील विजय चौकात होती त्याचवेळी भाजपने दिलेल्या श्री शंकर सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक सहकार्यावर कारखाना सुरू करून कारखान्याचे नैवेद्य घेऊन त्याचा दिवशी रणजीत चे मोहिते पाटील कार्यकर्ते शिंगणापूरला गेलेले होते.

आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील माळशिरस तालुक्यामध्ये कोणत्याही भारतीय जनता पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहत नाहीत मात्र पुणे मुंबई येथे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील कॅबिनेट व राज्यमंत्री यांच्या सभेत राहून भारतीय जनता पक्षावर असणारी बेगडी प्रेम दाखवत आहे त्यांची खात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना झालेले आहे त्यामुळे आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाला जाणीवपूर्वक देवेंद्रजी फडणवीस यांनी शुभेच्छा न देता अन्य आमदारांना दिलेल्या महाराष्ट्रातील जनतेने पाहिलेले आहेत.

भारतीय जनता पक्षात रणजीत सिंह मोहिते पाटील यांना जाणीवपूर्वक कार्यक्रमांमधून वगळले जात आहे सोलापूरच्या विमानसेवा उद्घाटन प्रसंगी सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातली पाहिलेली आहे सध्या स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपरिषद नगरपालिका निवडणुकीची प्रभाग रचना सुरू आहे भाजपच्या व माहितीच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन निर्माण झालेले आहे रक्तदान व वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन भारतीय जनता पक्षामधील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याची काम रणजीत सिंह मोहिते पाटील मित्र परिवार कार्यकर्त्यांमधून सुरू असलेली निष्ठावान भाजप कार्यकर्ते संकल्पना आहे त्यामुळे केंद्रीय राज्यातील नेतृत्वाच्या गोष्टीकडे डोळेझाक करतील या ते मात्र शंका नाही मात्र आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांना उठना मावशीचे प्रेम उत्पन्न झाल्याची उमजदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# बोरगाव तुळजापूर येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उस्मानाबाद : जिल्हा प्रशासन व ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षलागवड व संवर्धन कार्यक्रमा अंतर्गत आज बोरगाव येथे सरपंच सौ.कविता गौतम कांबळे आणि उपसरपंच लक्ष्मणराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली वृक्षलागवड कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच कविता कांबळे होत्या.यावेळी उपसरपंच लक्ष्मणराव पाटील, ग्राम पंचायत सदस्य राम कलकुटे, बसंतराव मुळे ,तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष मधुकरराव सुतार ,कृषी सहाय्यक कांबळे साहेब ,तलाठी दयानंद जोगदंड साहेब , आरोग्य खात्याचे कर्मचारी, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.चौधरी सर,हुतात्मा बाबूराव बोरगावकर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री .पाटील सर ,अंगणवाडी ताई, आशा कार्यकर्ती, ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी सह गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत सादर करण्यात आले .त्यानंतर वृक्ष लागवडीची शपथ सर्वांना देण्यात आली ,ग्रामपंचायत अधिकारी संजय नवगिरे यांनी शपथ दिली.त्याचबरोबर परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव श्री.मारुती बनसोडे यांनी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन माने सर यांनी केले .यावेळी गावातील सर्व विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वप्रथम पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य व नागरिकांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा कार्यक्रम संपन्न झाला .सर्व विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आली होती .अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमासाठी तुळजापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री.कावळे साहेब (पंचायती विभाग )या ठिकाणी उपस्थित होते . आज जवळपास ३००० वृक्ष लागवडीचा शुभारंभ बोरगाव येथे करण्यात आला असून तुळजापूर तालुक्यातील एकूण अठरा गावांमध्ये आज हा कार्यक्रम संपन्न झाला यात बोरगाव मध्ये ही विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे सीसीटीव्हीच्या माध्यमातुन माहिती जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचविण्यात आली. धाराशिवचे जिल्हाधिकारी श्री कीर्ती किरण पूजार यांच्या या महत्वकांक्षी संकल्पनेला जनतेचा प्रचंड प्रतिसाद दिसून आलेला आहे. संपूर्ण जिल्ह्यामध्ये आज फार मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत ला त्यांनी टार्गेट दिले आहे आणि सर्व प्रशासकीय यंत्रणा या कामांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाली असून लोकसहभाग ही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

# एन.के.टी. ग्रुप, ठाणे येथे शैक्षणिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक कार्यावर सखोल चर्चा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : ठाणे येथील एन.के.टी. ग्रुपच्या कार्यालयात आज एक विशेष बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्याचा आढावा घेण्यात आला. आगामी काळात वर्षभर चालणाऱ्या उपक्रमांची दिशा आणि धोरण यावर मंथन झाले.



या चर्चासत्रात थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यात विशेष सविस्तर संवाद झाला. त्यांनी ३६५ दिवसांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आढावा घेतला आणि भविष्यातील उपक्रमांसाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष आणि दैनिक समर्थ गांवकरीचे मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, तसेच मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत शाळा-संस्था, आरोग्य शिबिरे, पत्रकार संरक्षण, समाजप्रबोधन, युवा घडवणूक आदी विषयांवर अभ्यासपूर्वक चर्चा झाली. यावेळी सामाजिक संस्थांच्या समन्वयाने जास्तीत जास्त जनतेपर्यंत उपयुक्त सेवा पोहोचवण्याचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन नेटकेपणाने पार पडले असून, उपस्थितांनी भविष्यातील संयुक्त उपक्रमांसाठी एकत्रित काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# राज्य शासनाकडून अरण तीर्थक्षेत्राच्या १५० कोटीच्या विकास आराखड्याला मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, अरण, ता. माढा जि.सोलापूर या तीर्थक्षेत्रास अ वर्ग दर्जा देऊन तीर्थक्षेत्र विकसित करण्याची घोषणी केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांमार्फत श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, अरण ता. माढा जि. सोलापूर तीर्थक्षेत्रास अ वर्ग दर्जा देण्यात आला असून ह्या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, अरण ता. माढा जि. सोलापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा या नवीन योजनेस मान्यता देण्याचा प्रस्ताव दि.१७ जुलै २०२५ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला. आज दि.१७ जुलै २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, अरण ता. माढा जि. सोलापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा ही नवीन योजना महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांमार्फत राबविण्यास मान्यता देवून त्यासाठी रु.१५० कोटी इतक्या रक्कमेच्या विकास आराखड्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या मंजूर आराखड्यामध्ये सभा मंडप, भक्त निवास व अन्नछत्र, संतसृष्टी म्युझियम, दर्शन मंडप, स्वच्छतागृह, छत असलेली मार्गिका, देवस्थान प्रशासकीय कार्यालय, बस स्टॉप, मुख्य मंदिर जीर्णोद्धार व सुशोभिकरण, श्री विठ्ठल आणि श्री संत शिरोमणी सावता महाराज ब्राँझ पुतळा, स्कायवॉक, पाण्याची टाकी, जुनी विहीर जिर्णोद्धार व सुशोभिकरण, म्युझियम मिडिया रंगकाम व भिंती चित्रे, कमान व वाहनतळ, पालखी तळ सुधारणा, भुमी रचना (हार्डस्केप) व सौंदर्यकरण, पोच मार्ग सुधारणा, पाणी पुरवठा व ड्रेनेज लाइन, जलपुनर्भरण, कचरा संकलन प्रणाली, साइन बोर्ड/दिशा दर्शक कार्यालय, विद्युतीकरण, वातानुकुलित यंत्रणा, सीसीटीव्ही यंत्रणा इत्यादी विकास कामांचा समावेश आहे. याबाबतचे उचित शासन निर्णय आदेश सत्वर निर्गमित करण्यात येत आहे. हा विकास आराखडा तयार करण्यासाठी राज्याचे मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज तथा सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे यांनी आराखडयाच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागामार्फत शासन स्तरावर विशेष पाठपुरावा केला आहे. तसेच इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांचेही योगदान लाभले. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता केल्याबददल पालकमंत्री श्री. गोरे, यांनी मुख्यमंत्री यांचे विशेष आभार मानले आहेत.

# विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्त्यामुळे रद्द ॲडमिशनचे पैसे परत मिळाले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट सी.बी खेडगी महाविद्यालयामध्ये ८ दिवसापूर्वी बीए प्रथम वर्षात काही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता पण त्या विद्यार्थ्यांचं नर्सिंग महाविद्यालय मध्ये काल नंबर लागल्यामुळे विद्यार्थ्यांनी लगेच खेडगी महाविद्यालयातील ऍडमिशन रद्द करण्यासंदर्भात अर्ज केला होता त्यावेळी विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे फीसचे पैसे परत करण्यात आले नाहीत



यावेळी सी,बी खेडगी महाविद्यालयातील संबंधित क्लार्कची भेट घेतली आणि या विषयावर चर्चा केली आणि लगेच त्यांनी नियमाप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांना फी चे पैसे परत केले

याप्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे, साहिल कांबळे, आणि विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पोलीस प्रमुखांनी थोपटली स्वेरीतील विद्यार्थ्यांची पाठ

## वारी दरम्यान पोलीस मित्र या उपक्रमात स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारी काळामध्ये पंढरपूरमध्ये विक्रमी गर्दी असताना देखील शहरातील महत्वाच्या भागात पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून स्वेरीतील विद्यार्थी मदत कार्य करत होते. विद्यार्थ्यांच्या या लक्षवेधी कार्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ०३ जुलै ते दि. ७ जुलै २०२५' दरम्यान पोलीस मित्र या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंढरपूर मध्ये आषाढी वारीच्या निमित्ताने लाखो वारकरी जमले होते. स्वेरीने नेहमीप्रमाणे शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यात देखील सहभाग घेत या परंपरेला अनुसरून 'पोलिस मित्र' म्हणून पोलिस प्रशासनाला लाख मोलाची मदत केली. हे सामाजिक कार्य करताना स्वेरीतील विद्यार्थी तहान भूक हरवून कार्य करत असल्याचे जाणवले. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानून विद्यार्थ्यांनी पोलिस प्रशासनाला अनमोल मदत केली त्यामुळे या कार्याची दखल पोलीस खात्याने घेऊन सोलापूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी या सामाजिक कार्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. वाहतूक नियोजन, वारकरी भक्तांचे नियोजन, स्वच्छतेचे आवाहन, स्वच्छता अभियान, डिजिटल डिटॉक्स डे दिंडी, पथनाट्य अशा वेगवेगळ्या उपक्रमांचे नियोजन करून खऱ्या अर्थानी वारी अगदी भक्तिमय आणि आनंदाने पार पाडण्यास स्वेरीतील विद्यार्थ्यांनी मदत केली. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे व डॉ. धनंजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीतील रासेयों मधील सुमारे १८० विद्यार्थ्यांनी पोलीस खात्याला सहकार्य केले. या पाच दिवसाच्या कालावधीत विद्यार्थी गौतम विद्यालय, सांगोला चौक, सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चंद्रभागा वाळवंट, अंबाबाई पटांगण, पंढरपूर अर्बन बँक व चंद्रभागा बस स्टँड या ठिकाणी गर्दीत उभे राहून वारकऱ्यांना सहकार्य करत होते. यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख अचानक सर्व ठिकाणी भेट देत असताना स्वेरीतील विद्यार्थी वारकऱ्यांना मार्गदर्शन, मदत कार्यात मग्न असल्याचे जाणवत होते त्यामुळे पोलीस प्रमुखांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांना जवळ घेवून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

> **पाच दिवस मदत कार्य करताना आम्ही वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. आम्ही केलेल्या मार्गदर्शनामुळे वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलत होते. त्यांचा आनंदी चेहरा पाहून आमचा उत्साह द्विगुणीत होत होता यातून आम्हाला एक जणू विठ्ठल भेटीचा आनंद मिळाला.**
>
> **– हर्षदा दमगुडे– द्वितीय वर्ष अभियांत्रिकी स्वेरी पंढरपूर**

---

# के. के. वाघ महाविद्यालयाच्या १७ विद्यार्थ्यांची वेस्टसाईड टाटा ट्रेंट लिमिटेडमध्ये नोकरीसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के. के. वाघ काकासाहेब नगर महाविद्यालयातील १७ विद्यार्थ्यांची वेस्टसाईड – टाटा ट्रेंट लिमिटेड, नाशिक या नामांकित कंपनीच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यातून यशस्वी निवड झाली आहे.



रोजगार मेळाव्यासाठी वेस्टसाईड टाटा ट्रेंट लिमिटेडच्या वतीने रोहित वासनिक, करण बैरागी व . तेजस मगर हे प्रतिनिधी काकासाहेब नगर महाविद्यालयात उपस्थित होते. मुलाखतीस प्रारंभ करण्यापूर्वी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर . रोहित वासनिक यांनी कंपनीच्या कार्यपद्धती, भूमिका आणि संधी याविषयी माहिती दिली.

या निवडीबद्दल के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के.एस.बंदी, संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, समन्वयक डॉ. विनायक सेवलीकर, सल्लागार डॉ. आर. के. दातीर, प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस. गवारे, डॉ. पी. के. शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कला व वाणिज्य शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ही संधी मिळवली.

या संपूर्ण उपक्रमामध्ये काकासाहेब नगर महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे अधिकारी डॉ. अरुण ठोके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामुळेच ही निवड यशस्वीपणे साध्य झाली.

या निवडीमुळे पालक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस. गवारे यांनी भविष्यातही असे रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी अधिकाधिक संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी केले.

---

# कॅप्टन जोशी स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येणेगूर येथे वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिंदगाव/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील येणेगूर येथे आज दिनांक १९.०७.२०२५ वार शनिवार रोजी प्रशालेत हरित धाराशिव अभियान व एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत पालक, लोकप्रतिनिधी व प्रशालेतील मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या हस्ते २५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले श्री परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके ग्राम पंचायत सदस्या लक्ष्मीताई पाटील आशाबानू मकानदार शिक्षण प्रेमी व सामाजिक कार्यकर्त्या चंदाराणी घोरपडे पालक प्रतिनिधी वर्षाराणी



घोरपडे खैरूनिसा शेख आशाताई भुसार पुष्पाताई घोरपडे समीना खजुरे सुजाता काटगावे शहाणाज पठाण बिस्मिल्ला शेख मदिना भालके अण्णाप्पा जमादार बसाय्या स्वामी मोतीसिंग राजपूत हाजीमलंग फरकांडे साई बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संस्कृती विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक शंकर हुळमजगे आनंदराज बिराजदार सौरभ उटगे महेश खंडाळकर चंद्रकांत बिराजदार सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

---

# विचारांची उंची वाढवा : डॉ. वैष्णवी चव्हाण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोमलवाडी/प्रतिनिधी : जनता विद्यालय कोमलवाडी येथे विशाखा व सखी सावित्री समिती साठी रोटरी क्लब ऑफ गोंदेश्वर सिन्नर अंतर्गत, किशोरवयीन मुलींच्या आरोग्य विषयक जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने डॉक्टर वैष्णवी नेहे यांनी इयत्ता सातवी ते दहावीच्या मुलींना मार्गदर्शन केले. आरोग्य बाबत समस्या, शारीरिक बदल ,मानसिक बदल, समाजात वावरताना कसे वागावे याबाबत डॉक्टरांनी उपयुक्त असे मार्गदर्शन आपल्या व्याख्यानातून केले.समाजात बदल घडवण्यासाठी आपल्या विचारांची उंची वाढवली पाहिजे,आपले विचार उच्च असले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कपड्यांवरून किंवा बाह्य रूपावरून एखाद्या व्यक्तीचा दर्जा न ठरवता त्यातील गुणांवरून ठरवावा असे त्यांनी सांगितले. वाढत्या वयाबरोबर मुलींमध्ये होणारे शारीरिक बदल त्याला कसे सामोरे जावे तसेच वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी, त्याचबरोबर कुठल्याही प्रलोभनांना बळी न पडता सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून आपले कर्तव्य कसे पार पाडावे याचे उत्तम असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक, शालेय समिती अध्यक्ष शरद घुले, रोटरी क्लब ऑफ गोंदेश्वर सिन्नर चे सदस्य सतीश नेहे, सचिन गिते, मनीषा गोराडे, स्वाती जोंधळे चित्रा बाजारे, ऋतुजा वाघ, शितल रायते, कीर्ती गवारे यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

---

# बिझनेस असोसिएट कोर्स प्रमाणपत्र वितरण समारंभ सेवा फाउंडेशन, राह फाउंडेशन आणि एंजेल वन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सेवा फाउंडेशन, राह फाउंडेशन आणि एंजेल वन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बिझनेस असोसिएट कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ दिनांक १८ जुलै २०२५ रोजी सोलापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभात एकूण ५० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.




या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रशांत नलावडे (वर्ग २ अधिकारी, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार कार्यालय, सोलापूर), कु. तृष्णा गायकवाड (यंग प्रोफेशनल, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार कार्यालय, सोलापूर) आणि श्री. शुभम खरात (वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक, राह फाउंडेशन, मुंबई) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात सेवा फाउंडेशनच्या केंद्र व्यवस्थापक मिस. मनिषा आनंद वाघमारे यांच्या प्रस्ताविकाने झाली. सूत्रसंचालन श्री. प्रशांत गर्गे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. शीतल कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. या उपक्रमामध्ये सेवा फाउंडेशन, राह फाउंडेशन आणि एंजेल वन यांनी संयुक्तपणे स्थानिक युवकांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, भविष्यात असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

**सापळा रचून केली कारवाई**

**विविध गुन्ह्यातील होता आरोपी, मिळाली पोलिस कोठडी**

# येरवडा कारागृहातील न्यायबंदी फरार आरोपी उल्हासनगर येथे अटक; उल्हासनगर पोलीस विभागाची कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/प्रतिनिधी : उल्हासनगर पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने न्यायबंदी फरार आरोपी अनिल मेघदास पटेनिया, वय २८ वर्षे यास सापळा रचुन रंगेहाथ पकडुन त्याचे कब्जातुन या गुन्ह्यातील चोरीस गेलेली ॲक्टीवा मोटार सायकल क्र. MH-०५/BZ-२२९४ ही हस्तगत केली आहे.



उल्हासनगर पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुन्हा रजि. क्र. १६९१/२०२५ भा. न्या.सं.क. ३०३ (२) प्रमाणे दिनांक १६/०७/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने मा. वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशाने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप-निरी. नवले, पो. हवा. भोजणे, पो.हवा. कांबळे, पो.हवा. पाटील, पो.हवा. पाडेकर, पो.हवा. सिध्दार्थ गायकवाड, पो.कॉ. सोनवणे, पो.कॉ. शेकडे, पो. कॉ. तडवी असे पथक नेमण्यात आलेले होते.

सदर गुन्हयाचे प्राथमिक तपासा दरम्यान तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने एक इसम हा नमुद गुन्हयातील चोरीस गेलेली ॲक्टीवा मोटार सायकल क्र. चक-०५/इन-२२९४ ही घेवुन दुर्गामाता नगर, खेमानी, उल्हासनगर १ या परीसरात फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने मिळालेल्या बातमीची खात्री केली असता नमुद संशयीत इसमास पळुन जाण्याचा वाव न देता जागीच ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणले. नमुद संशयीत इसमाकडे त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अनिल मेघदास पटेनिया, वय २८ वर्षे, राह. डिम्पल हॉस्पिटलसमोरील गल्लीत, म्हारळ गाव, ता. कल्याण जि. ठाणे असे असल्याने सांगुन त्याने नमुद मोटार सायकल ही चोरी केली असल्याची कबुली दिली. तसेच त्याचेकडे आणखीन विचारपुस करता तो टिटवाळा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १ १४७/२०१६ भा.दं.वि.क. ३०२ व इतर मध्ये येरवडा कारागृह, पुणे येथे जन्मठेपेचे शिक्षेत न्यायबंदी असता ओपन जेलमधुन पळुन आला असल्याचे त्याने कळविले. त्याबाबत येरवडा पोलीस स्टेशन, पुणे येथे संपर्क साधुन खात्री केली असता सदर प्रकाराबाबत येरवडा पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा रजि. नं. १८३३/२०२४ भा.न्या.सं. क. २६२ प्रमाणे दिनांक ११/१२/२०२४ रोजी गुन्हा नोंद आहे. करीता नमुद आरोपीस उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा रजि. नं. १६९१/२०२५ भा. न्या.सं.क. ३०३ (२) या गुन्हयात दिनांक १७/०७/२०२५ रोजी ००.५५ वा. अटक करण्यात आली असुन त्यास मुदतीत मा. न्यायदंडाधिकारी सो., प्रथम वर्ग, २ रे न्यायालय, उल्हासनगर यांचे न्यायालयात हजर केले असता त्यास दिनांक १८/०७/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे.

सदर कारवाई मा. पोलीस आयुक्त वरिष्ठ, ठाणे शहर, माननीय सह-पोलीस आयुक्त सा. ठाणे शहर, मा. अतिरिक्त पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण श्री. संजय जाधव, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ ४, उल्हासनगर श्री. सचिन गोरे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, उल्हासनगर श्री. अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री. विष्णू ताम्हाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हासनगर पोलीस ठाणे, श्री. अंकुश म्हस्के, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस उपनिरीक्षक / पी.के. नवले, पी.हवा. सुजित भोजने, पी.हवा. प्रमोद कांबळे, पी.ओ. हवा. भगवान पाटील, पी.हवा. विलास पाडेकर, पी.ओ. हवा. सिद्धार्थ गायकवाड, पी.ओ. संदीप सोनवणे, पी.सहकारी. संदीप शेकडे, पो.कॉ. राजू तडवी. यांनी केली आहे.

---

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या मागणीला यश



कळंब/प्रतिनिधि : राज्यामध्ये जून २०२३ पासून विभागीय केंद्रप्रमुख भरती परीक्षा फॉर्म भरून ही आजपर्यंत झालेली नाही. ही विभागीय केंद्रप्रमुख भरती परीक्षा रखडलेली आहे.यातली मूळ अडचण अशी होती की ग्रामविकास विभागाने अधिसूचना प्रसिद्ध करणे बाकी होते.याबाबत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने मंत्रालयामध्ये ग्राम विकास विभागाशी संपर्क साधून सतत पाठपुरावा केला..प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले व सरचिटणीस संतोष भोजणे यांनी स्वतः मंत्रालयात जाऊन ग्रामविकास विभागाचे जडऊआदरणीय नारायण गोरे साहेब यांची भेट घेऊन ही बाब लक्षात आणून दिली होती. त्याची आज परिणिती झालेली आहे आणि आज ग्राम विकास विभागाने केंद्रप्रमुख पदा संदर्भात अधिसूचना जाहीर केलेली आहे. आता परीक्षेचा कायदेशीर मार्ग मोकळा झालेला आहे..

शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी नक्कीच या आदेशाचा उपयोग व्हावा ही अपेक्षा.राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी व्यक्त केली आहे.

शिक्षण व्यवस्थेतील प्राथमिक विभागात केंद्रप्रमुख हे पद अतिशय महत्त्वाचे व ग्राऊंड लेवल वरील असल्यामुळे आणि राज्यात आज घडीला जवळपास ८० टक्के शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी यासह गटशिक्षणाधिकाऱ्याची पदे तात्पुरता पदभार दिल्यामुळे शैक्षणिक दुरावस्था झाल्याची दिसून येते. सदरील आदेशान्वये लवकरच पदोन्नतीने आणि परीक्षेद्वारे कायम हक्काचे केंद्रप्रमुख शिक्षण व्यवस्थेला मिळतील आणि राज्याचा शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावेल याबद्दल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने राज्याध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण,सुमित पवार,संजय मळभागे, अनंत फुलसुंदर, सुखदेव भालेकर, लक्ष्मण दावणकर, हिरालाल पाटील, लक्ष्मण वडमिले, सचिन गडपतवार, चंद्रशेखर तिखे,विलास काळे शरद वरेकर, लहू राक्षे,रेखा सुडे, राजेंद्र खैरनार, शेवाळे सर यांनी ग्रामविकास मंत्रालयातील सर्व अधिकारी व मंत्री महोदयांचे अभिनंदन केले आहे.

## थोडक्यात...




### हात उसने घेतलेल्या पैशावरून शिवीगाळ करत मारहाण ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) हात उसने घेतलेल्या पैशावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोघींनविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना १६ जुलै रोजी न्यू बुधवार पेठ येथे घडली.याप्रकरणी आलका विशाल साखरे (रा.रमाबाई आंबेडकर नगर,न्यू बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अलका शहाजी कांबळे व पल्लवी शहाजी कांबळे (रा.न्यू बुधवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी या घरी असताना शेजारी राहणारे वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना अलका कांबळे हिने पन्नास रुपये हात उसने दे असे म्हणाल्या असता, फिर्यादी त्यांना माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणाले,त्यावेळी वरील दोघींनी शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.तसेच पल्लवी कांबळे हिने पडलेला विटेचा तुकडा घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक ओव्हळ फौजदार हे करीत आहेत.

### हॅण्डल लॉक केलेल्या दोन दुचाकी पळवल्या

सोलापूर (प्रतिनिधी) हॅण्डल लॉक करून ठेवलेल्या दोन दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आले आहेत.पहिली घटना ही सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुमठा नाका येथे १३ जुलै रोजी घडली. फिर्यादी नागेश मल्लिनाथ शिरसी (वय-३७,रा.चाटी गल्ली) यांनी घरासमोर हॅण्डल लॉक करून ठेवलेले दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीई.८९७० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार भोगशेट्टी हे करित आहे.

दुसरी घटना ही सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुमठा नाका येथे दिनांक १३ जुलै रोजी घडली. फिर्यादी मजर जावेद शेख (वय-२८-,रा.साईनाथ नगर,अमन चौक) यांनी हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीएक्स.८०८५ हि अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी मजहर शेख यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मुलाणी हे करीत आहेत.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील कौशल्य शोधून त्यांना घडवावे : पालकमंत्री गोरे

## सोलापूर विद्यापीठातील उद्यमशाळा-शिक्षक प्रशिक्षणाचा समारोप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भविष्य घडवण्याची व चांगली पिढी निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. त्यामुळे शिक्षकांनी प्रथमता शिकण्याबद्दल विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करून त्यांना शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांमधील कौशल्य शोधून त्यांना त्यादृष्टिकोनातून घडवावे, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री श्री जयकुमार गोरे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य विभागातर्फे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांकरिता आयोजित 'उद्यमशाळा' या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप पालकमंत्री श्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे होते. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उद्योजिका चंद्रिका चौहान, सेवावर्धिनीचे गिरीश देगावकर, शिवरत्न पवार, विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. विकास पाटील, कौशल्य विकास विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, सिनेट सदस्य रोहिणी तडवळकर, शशिकांत चव्हाण, इनक्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश गुराणी, विनायक बंकापूर, चन्नवीर बंकुर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेसाठी प्रिसिजन फाउंडेशन, सर फाउंडेशन, सेवावर्धिनी, स्वदेशी जागरण मंच, साविष्कार या संस्था सहआयोजक आहेत. एकूण दोन हजार शिक्षकांचा यामध्ये सहभाग होता.

पालकमंत्री श्री गोरे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने कौशल्य विकास व उद्योजकतेबाबत शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबवला, याचे खरच कौतुक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच कौशल्य विकास आणि उद्योजकतेबाबत आग्रही आहेत. यासाठी विविध योजना आहेत. त्या सर्व गोष्टींचा अभ्यास करून शिक्षकांनी शालेय वयातच विद्यार्थ्यांच्या मनावर कौशल्य विकास व उद्योजकतेबाबत संस्कार करण्याबरोबरच त्याबाबत मानसिकता तयार करावी, असे आवाहन देखील पालकमंत्री श्री गोरे यांनी यावेळी केले. कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, आज जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवल्याचे आपण पाहतो. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षक हे फार महत्वाचे असतात. समस्या व अडचणी निर्माण झाल्यास नेहमीच त्यावर उपाय निघतो आणि तेथूनच खऱ्या अर्थाने संशोधनास चालना मिळते. आणि हे काम आज ग्रामीण भागात होत असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य आणि बुद्ध्यांक नेहमी अधिक असतो. त्यामुळे त्या दृष्टिकोनातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे, असे आवाहन देखील कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी केले. प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या शिक्षकांनी आवर्जून विद्यापीठ भेटीसाठी विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करावे आणि येथील सोयी सुविधांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले.




## डुबेरे विद्यालयात कर्मवीर गणपत दादा मोरे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलीत डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मविप्र संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर गणपत दादा मोरे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

अध्यक्षांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते . व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार , पी.आर.करपे,सोमनाथ पगार, सोमनाथ गिरी, रेखा खंडीझोड,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत ,सुनील ससाणे ,डी.ए.रबडे,कचेश्वर शिंदे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कर्मवीर मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तनुजा कडभाने,संस्कृती वाजे,श्रावणी माळी,अक्षदा वाजे, प्रतिज्ञा जगधने या विद्यार्थिनीनी कर्मवीर मोरे यांच्या कार्याची ओळख करून दिली.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक उगले म्हणाले की ,मविप्र संस्थेचे आश्रयदाते तसेच आद्य संस्थापक सत्यशोधक कर्मवीर मोरे यांनी गोरगरीब जनतेची, समाजाची व मविप्र संस्थेची अहोरात्र सेवा केली. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच उगले यांनी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा परिचय करून दिला.केले.वर्गशिक्षिका विनिता देवरे व जयश्री गोहाड मार्गदर्शनाखाली इयत्ता- १० वी तु-ब च्या वर्गाने कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सानिका ढोली हिने केले तर आभार प्रदर्शन कार्तिकी कडभाने केले .यावेळी शिक्षक ,शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे पक्षाची इंदापूर येथे बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच इंदापूर नगरपरिषद निवडणुकीच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी इंदापूर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने आज शासकीय विश्रामगृह इंदापूर या ठिकाणी प्रमुख पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय काळे , तालुकाप्रमुख नितीन शिंदे, शहर प्रमुख मेजर महादेव सोमवंशी, तालुका समन्वयक अरुण पवार, तालुका संघटक सुदर्शन रणवरे यांच्यासह उपतालुकाप्रमुख आप्पासाहेब डोंगरे, उपतालुकाप्रमुख संदीप चौधरी, उपतालुकाप्रमुख सोमनाथ शेंडे, युवासेना तालुकाप्रमुख सचिन इंगळे, युवासेना शहरप्रमुख अविनाश खंडाळे, शिवसेना उपशहरप्रमुख संतोष क्षीरसागर, उपशहरप्रमुख बंडु शेवाळे, उपशहरप्रमुख दादा देवकर, विभागप्रमुख रणजित बारवकर, विभागप्रमुख अभिजित पाटील, विभागप्रमुख महादेव चोपडे, उपविभागप्रमुख विजय तरंगे, सुदर्शन माने, ब्रम्हदेव थोरात आदी शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शिवसेना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुर्ण ताकदीने लढणार असून त्या अनुषंगाने तयारीचा पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. शिवसेना लवकरच प्रत्येक नव्याने झालेल्या जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात बैठका घेणार असून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तालुकाभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत. लोकांच्या प्रश्नावर कायमच आक्रमक भूमिका घेणारी शिवसेना पुन्हा तीच आक्रमकता घेऊन मैदानात उतरणार आहे. शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख आ. सचिन अहिर यांच्या सूचनेनुसार आगामी निवडणुकी संदर्भात पदाधिकाऱ्यांशी बैठक घेऊन चर्चा केली आहे. बैठकीत झालेल्या चर्चेचा अहवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पाठण्यात येणार आहे, असे शिवसेना तालुकाप्रमुख नितीन शिंदे म्हणाले.

**आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये जिल्ह्याची नोंद**

**महाराष्ट्रातील पहिला मान धाराशिव जिल्ह्याला वृक्ष दिंडी काढीत केली वृक्ष लागवड**

# वनराईचे चांगले नंदनवन होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : पालकमंत्री प्रतापराव सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव (जिमाका) : हरित धाराशिव अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील २३४ ग्रामपंचायती,१३ नगरपालिका व ३ नगर पंचायती या ठिकाणी एक पेड माँ के नाम वृक्ष लागवड करीत १५ लाख वृक्षांची लागवड करून धाराशिव जिल्ह्याची इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्ड व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड या दोन्हीमध्ये रेकॉर्ड मिळविले आहे. लावलेले वृक्ष जगविण्यासाठी प्रशासनाबरोबर जनतेने जगविण्यासाठी काळजी घेतली तर धाराशिव जिल्हा निसर्गरम्य निश्चित होईल.विशेष म्हणजे या जिल्ह्याला निसर्ग सौंदर्य लाभलेले असून वनराईला अतिशय चांगले विकसित केले तर आसपासच्या जिल्ह्यातील लोकसुद्धा हे पर्यटन पाहण्यासाठी येतील.त्यामुळेच जिल्ह्यातील वनराईचे चांगले नंदनवन होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत,असे आवाहन परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी आज १९ जुलै रोजी केले.

दरम्यान,हा विक्रम करण्याचा मान धाराशिव जिल्ह्याच्या कपाळावर साकारला ही जिल्हावासियासाठी अभिमान व गौरवास्पद अविस्मरणीय कामगिरी ठरली आहे.

धाराशिव तालुक्यातील शिंगोली शिवारात वन विभागाच्या पाच हेक्टर क्षेत्रावर एक पेड माँ के नाम,जिल्हा प्रशासन आणि उत्स्फूर्त लोकसहभागातून हरित धाराशिव अभियान १५ लक्ष वृक्ष लागवडीचा शुभारंभ पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आला.त्यावेळी पालकमंत्री सरनाईक बोलत होते.यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील,आमदार कैलास घाडगे- पाटील,सिने अभिनेते स्वप्नील जोशी,माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना,छत्रपती संभाजीनगरचे वनसंरक्षक प्रमोदचंद लाखरा,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय अधिकारी वन व्ही.के.करे,प्रादेशिक विभागीय वन अधिकारी बी.ए.पोळ आदीची प्रमुख उपस्थिती होती.




पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले की,धाराशिव जिल्ह्याचे वनराई क्षेत्र करण्यासाठी अपेक्षित असेल तेवढा निधी उभारू व हा प्रकल्प यशस्वीपणे साकारून तसेच हिंगोली येथील वनराईसाठी बारा मीटरचा रस्ता करावा अशा सूचना देत ते म्हणाले की,जिल्ह्यातील वनक्षेत्र वाढवून ते विकसित करण्यासाठी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला तरी तो करु.वनक्षेत्र वाढविण्यासाठी कार्यक्रम राबवावा लागेल असे त्यांनी सांगितले.

लावलेली झाडे कशी टिकतील यासाठी जिल्हा प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे श्री.सरनाईक त्यांनी आवर्जून नमूद केले.लावलेली झाडे जगविण्याची मी जबाबदारी घेतो,मी जेव्हा जिल्ह्यात येईल तेव्हा ती झाडे आहेत की नाही यासाठी भेट देऊन त्या झाडांची पाहणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्याला राज्य व देश पातळीवर न्यायचे असेल तर सर्वच पक्षांनी एकत्रित येत वृक्ष लागवडीचे काम केले तर गिनीज बुक वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची निश्चितपणे नोंद होईल असे त्यांनी सांगितले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने ४० लाख वृक्षांची लागवड करायची असून उर्वरित २५ लाख वृक्ष लागवड करून आज स्थापित केलेले रेकॉर्ड मोडून काढीत जागतिक स्तरावर नवीन रेकॉर्ड करावे असे आवाहन श्री.सरनाईक यांनी केले.

तसेच आमदार कैलास पाटील यांनी शेत रस्त्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते म्हणाले की,त्यांच्या सुचनेचा निश्चितपणे जिल्हाधिकाऱ्यांनी विचार करून मोजणीच्या बाबतीत जिल्हा प्रशासनाने योग्य तोडगा काढून शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना त्यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाबरोबर जिल्हावासियांनी देखील प्रयत्न करावेत,असे आवाहन करीत हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी जिल्हाधिकारी पुजार यांचे कौतुक केले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की,आज आपण वृक्ष लागवडीचा जिल्ह्यामध्ये विक्रम घडवित आहोत.ही झाडे आपल्याला लावून चालणार नाही तर ती जगविण्यासाठी लोकप्रतिनिधी व सर्व नागरिकांनी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.एका व्यापक अभियानाचा भाग म्हणून आपण काम करीत आहोत. विशेष म्हणजे झाडे जगविणे ही सर्वांची जबाबदारी ही आपल्या कृतीमधून दाखवून द्यावी असे त्यांनी नमूद केले. तर शेत रस्त्यासाठी सर्व्हेच्या बाबतीत अडचणी येत असून प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या एजन्सीच्या माध्यमातून मोजणी करून त्या माध्यमातून शेत रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू असे आवाहन त्यांनी केले.त्याबरोबरच शिंगोली,घाटंग्री वृक्ष लागवडीसाठी ३०० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात येणार आहे.तसेच येडशी अभयारण्य परिसरात जिप्सी सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले

आ कैलास पाटील म्हणाले की,झाडे लावणे अवघड नाही ती जगविले अवघड आहे.झाडे किती जगतात ते महत्त्वाचे आहे.लोकांनी आपली जबाबदारी म्हणून वृक्ष संवर्धन करण्यासाठी झोकून दिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.तसेच शेत रस्त्यासाठी महसूलचा आदेश असला तरी रस्ता देण्यासाठी जमीन मोजणीची अडचण येत आहे. त्यामुळे भूमी अभिलेख आठ अधिकारीपैकी सहा पदे रिक्त आहेत ती भरावीत.शेत रस्त्याची जमीन मोजून देण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी सिने अभिनेते स्वप्निल जोशी यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्रस्ताविक जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी केले.सूत्रसंचालन क्षीप्रा मानकर यांनी व उपस्थितांचे आभार वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी व्ही.के.करे यांनी मानले.

प्रारंभी वृक्षदिंडी काढण्यात आली.तर कोनशिलेचे उद्घाटन व वृक्ष लागवड केल्यानंतर मुख्य कार्यक्रम स्थळी संत शिरोमणी तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी विद्यार्थी, शिक्षक,अधिकारी कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री.पुजार व डॉ.घोष यांचा दोन मेडल्सने सन्मान

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांनी जिल्ह्यात विविध ठिकाणी १५ लाख वृक्ष लागवड करण्यासाठी सर्व नागरिकांना सोबत घेऊन गेल्या तीन महिन्यांपासून प्रयत्न केले.त्या प्रयत्नास यश आले असून या वृक्ष लागवडीने विक्रम केला आहे.याची नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये जिल्ह्याची नोंद झाली आहे.त्याबद्दल या एजन्सीचे संजय भोला यांनी दिले. ती दोन्ही प्रमाणपत्र व मेडल्सने पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी पुजार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ घोष यांना सन्मानित करण्यात आले.